**ठळक बातम्या**

- लोकसभेत सभापती ओम बिरला यांच्याविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर येत्या सोमवारी सभागृहात  चर्चा होणार

- घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपये, तर व्यावसायिक वापराच्या सिलिंडरच्या किमतीत ११५ रुपये वाढ

- इंधनाचा पुरेसा साठा असून  तुटवड्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असं तेल कंपन्यांचं स्पष्टीकरण

- नेपाळमध्ये सार्वत्रिक निवडणुकीत, बालेंद्र शाह यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीची स्पष्ट बहुमताच्या दिशेनं वाटचाल

**आणि**

- ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या  उपान्त्य  फेरीत आज लक्ष्य सेन चा सामना कॅनडाच्या व्हिक्टर लाई बरोबर

**<><><><><>**

लोकसभेत सभापती ओम बिरला यांच्याविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर येत्या सोमवारी सभागृहात  चर्चा होणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा येत्या सोमवार नऊ मार्चपासून सुरू होत असून त्याच दिवशी या ठरावावर चर्चा अपेक्षित आहे. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात विरोधी पक्षांनी लोकसभा सचिवालयाकडे हा अविश्वास ठराव दाखल केला होता. या ठरावावर ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद, के. सुरेश  आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यावतीने पा प्रस्ताव मांडली जाणार आहे.

दरम्यान काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षानं नऊ आणि दहा मार्च रोजी सर्व सदस्यांना सभागृहात उपस्थित राहण्याचा व्हिप जारी केला आहे.

<><><><><>

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपयांनी वाढ झाली आहे. हे नवे दर महानगरांमध्ये लागू झाले आहेत. दर वाढीनंतर आता एका सिलेंडरची किंमत दिल्लीमध्ये ९१३ रुपये, मुंबईत ९१२ रुपये ५० पैसे, कोलकत्ता इथं ९३९ रुपये आणि चेन्नईमध्ये ९२८ रुपये ५० पैसे इतकी झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत देखील ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

<><><><><>

होर्मूझच्या सामुद्रधुनीतली जलवाहतूक बंद झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यात खंड पडल्याच्या समाज माध्यमांवर प्रसृत झालेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असून भारताकडे पुरेसे इंधन साठे आणि पर्यायी पुरवठा स्रोत आहेत असं हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीनं स्पष्ट केलं आहे. इंधन पुरवठ्यामधला व्यत्यय किंवा तुटवडा या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असून नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये तसंच पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असं कंपनीनं ट्विट करून सांगितलं आहे.

इंधन दरवाढ तसेच गॅसच्या पुरवठ्याबाबत प्रसारमाध्यमांनी नागरिकांमध्ये घबराट होईल अशा कुठल्याही बातम्या पसरू नये. यासंदर्भात सर्व माहिती केंद्र सरकार द्वारे देण्यात येत आहे असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात सांगितलं. नागपूरमधे अमरावती रोडवरील एक्स एस आय ओ या लॉजिस्टिक आणि इंडस्ट्रियल पार्कचे लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते .

<><><><><>

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नवी दिल्लीतल्या माणेकशॉ सेंटर इथं होणाऱ्या एका कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संबोधित करणार आहेत. महिला आणि बालविकास मंत्रालयानं हा कार्यक्रम आयोजित केला असून यामध्ये सुमारे हजार पेक्षा अधिक महिला उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात कामगार

गटातल्या आणि स्वयं सहाय्य्यता गटातल्या महिलांचं सक्षमीकरण या विषयांवर मान्यवर आपले विचार मांडणार आहेत.

महिला दिनाचा एक भाग म्हणून महिला आणि बाल विकास मंत्रालय उद्या नवी दिल्ली इथं महिलांच्या नेतृत्वाखाली ‘शक्ती पदयात्रा’ आयोजित करण्यात आली आहे. इंडिया गेट ते विजय चौक दरम्यान सकाळी साडेसात ते दहा वाजेपर्यंत ही पदयात्रा काढण्यात येणार आहे. ‘विकसित भारत - २०४७ चं स्वप्न साकार करण्यासाठी महिलांची महत्वपूर्ण भूमिका’ या पदयात्रेत अधोरेखित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीवरुन होणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. दार्जिलिंग इथं ९व्या आंतरराष्ट्रीय संथाळ परिषदेला राष्ट्रपतींनी संबोधित केलं. संथाळी भाषेला संविधानाच्या ८व्या सूचीत समाविष्ट झाल्यानंतर प्रस्थापित ओळख मिळाली असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं सुमारे ३३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं तसंच अंदाजे १८ हजार ३०० कोटी रुपयांच्या दिल्ली मेट्रो प्रकल्पांचं उदघाटन आणि पायाभरणी करणार आहेत. त्यासह सुमारे सव्वा बारा किलोमीटर आणि दहा किलोमीटर लांबीच्या दिल्ली मेट्रोच्या दोन नवीन कॉरिडॉरचं उदघाटन देखील त्यांच्या हस्ते होणार आहे. याचबरोबर जनरल पूल रेसिडेन्शियल अकोमोडेशन अर्थात GPRA पुनर्विकास योजनेअंतर्गत १५ हजार २०० कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचं ते उदघाटन करणार आहेत. या वसाहतींचं आधुनिकीकरण, सरकारी कर्मचारी आणि प्रशासकीय कार्यालयांसाठी जागतिक

दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या सरकारच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाचा हा  एक भाग आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना जनऔषधी दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी परियोजनेच्या लाभार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांनी जनऔषधी केंद्रांचं महत्त्वही अधोरेखित केलं आहे. या केंद्रांमुळे अगणित कुटुंबाना योग्य उपचार मिळून त्यांचा औषधाचा खर्च कमी झाल्याचही त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात मह्टलं आहे.

<><><><>

नेपाळमध्ये युवा आंदोलकांनी सरकार उलथवून लावल्यानंतर नव्या सरकारच्या निवडीसाठी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत, बालेंद्र शाह यांच्या राष्ट्रिय स्वतंत्र पार्टी या पक्षानं निर्याणक बहुमताच्या दिशेनं आघाडी घेतली आहे. १६५ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीच्या आत्तापर्यंतच्या निकालांमध्ये राष्ट्रिय स्वतंत्र पार्टीनं काठमंडुतल्या सर्व दहा जागांसह ३४ जागा जिंकल्या आहेत, तर आणखी ८६ जागांवर आघाडी घेतली आहे.   नेपाळी काँग्रेसनं सहा जागा जिंकल्या असून, ते दहा जागांवर आघाडीवर आहेत. नेपाळी कम्युनिस्ट पार्टीनं दोन जागांवर विजय मिळवला असून, ते आठ जागांवर आघाडीवर आहे. तर माजी प्रधानमंत्री के पी ओली यांच्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळला आत्तापर्यंत फक्त एका जागेवर विजय मिळाला असल्याची माहिती तिथल्या निवडणूक आयोगानं दिली आहे.

<><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. अमेरिका आणि इस्राएल विरुद्ध इराण या आज  युद्धाचा आठवा दिवस असून दोन्ही बाजूंनी  सातत्यानं हल्ले सुरु आहेत.

इराणची राजधानी तेहरानवर झालेल्या आज पहाटे हवाई हल्ल्यात मेहराबाद विमानतळाचं नुकसान झाल्याचं वृत्त आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्यांमधे इराणमध्ये महिला आणि मुलांसह १ हजार ३३२ नागरिक मृत्यूमुखी पडले असल्याची माहिती संयुक्त राष्ट्रसंघातले इराणचे राजदूत आमीर सईद इरावानी यांनी दिली. इराणचे नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांना जाणूनबुजून लक्ष्य केलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला. इराण स्वसंरक्षणाच्या अधिकाराचा वापर करत प्रतिहल्ले सुरूच ठेवेल असंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान अमेरिका इस्रायलला आणखी शस्त्रपुरवठा करत आहे. १५ कोटी १० लाख नवीन शस्त्रास्त्र विक्रीप्रस्तावाला राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनानं मंजुरी दिली आहे.

इराणबरोबर कोणत्याही वाटाघाटी करायला ट्रम्प यांनी नकार दिला आहे. इराणनं बिनशर्त शरणागती पत्करावी, अमेरिका आणि त्याचे मित्र राष्ट्र इराणला विनाशाच्या गर्तेतून बाहेर काढून, पूर्वीपेक्षा उत्तम राष्ट्र बनवण्यासाठी अथक परिश्रम करतील असं त्यांनी म्हटलं आहे.

चुकीच्या गृहितकांआधारे आखाती देशांवर हल्ले करणं इराणने थांबवावं असं आवाहन सौदी अरेबियानं केलं आहे.

दुसरीकडे आज पहाटे लेबनॉनच्या पूर्वेकडच्या भागात नबी चित शहराजवळ स्थानिक जवान आणि इस्रायलच्या सैन्यात चकमक झाल्याचं लेबनॉनच्या सरकारी वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या बातम्या भडक दृष्यांसह दूरचित्रवाहिन्यांनी दाखवू नयेत असं केंद्रसरकारने सांगितलं आहे. अशा प्रकारे सनसनाटी बातम्यांच्या स्वरुपात वार्तांकन केलं तर परिणामतः घबराट पसरू शकते. त्यामुळे

वृत्तवाहिन्यांसाठीचं टेलिव्हिजन रेटींग पॉईंट्सचं मानांकन ४ आठवड्यांसाठी स्थगित करण्याचे आदेश केंद्रसरकारने दिले आहेत.

**<><><><><>**

सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत, मणिपूरमधल्या विविध प्रतिबंधित संघटनांच्या चार अतिरेक्यांसह पाच जणांना अटक केली आहे.
इम्फाळ आंतरराष्ट्रीय विमानतळावरून काल एनआरएफएमच्या एक सक्रिय कार्यकर्याला ताब्यात घेतलं तर, इम्फाळ पूर्व जिल्ह्यातून यूएनएलएफचा एक कार्यकर्ता आणि त्याच्या सहकाऱ्याला अटक केल्याची माहिती पोलीसांनी दिली. यासोबतच गुरुवारी बिष्णुपूर जिल्ह्यातून दोन वेगवेगळ्या प्रतिबंधित संघटनांच्या दोन कार्यकर्त्यांना अटक केल्याचंही पोलीसांनी सांगितलं.

आणखी एका कारवाईत इम्फाळमधल्या एका तलावाच्या काठावरून एक एचके-३३ रायफल, मॅगझिन आणि ३८ जिवंत काडतूसं तसंच तीन आयईडी स्फोटकं जप्त केल्याचंही पोलीसांनी सांगितलं.

**<><><><><>**

बर्मिंगहॅम इथं सुरु असलेल्या ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये जागतिक क्रमवारीत १२ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत त्यानं चीनच्या ली शी फेंगचा २१-१३,२१-१६ असा पराभव केला. उपान्त्य फेरीत त्याचा सामना कॅनडाच्या व्हिक्टर लाई बरोबर होईल. ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या मिश्र दुहेरी जोडीनं हाँगकाँगच्या तांग चुन मान आणि त्से यिंग सुएतविरुद्ध दुखापतीमुळं माघार घेतल्यानंतर या स्पर्धेत लक्ष्य सेन हा एकमेव भारतीय खेळाडू राहिला आहे.

**<><><><><>**

जागतिक बुद्धिबळ विजेता डी. गुकेशनं काल चेक प्रजासत्ताकमधील प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवात मास्टर्स विभागाच्या नवव्या आणि शेवटच्या फेरीत स्पेनच्या डेव्हिड अँटोन गुइजारोचा पराभव केला. गुकेश आणि गुइजारो साडेतीन गुण मिळवून संयुक्तपणे नवव्या स्थानावर राहिले.

**//<><><><><>//**